# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** वडगांव **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0077 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/02/2021 22:09 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 11/02/2021
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/02/2021
**Time From (वेळेपासून):** 11:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:37 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/02/2021 **Time (वेळ):** 14:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 030 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/02/2021 21:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 0.5 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** वडगांव पोलीस ठाणेच्या , आवारामध्ये,हातकणंगले

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** पंडीतराव बळवंत पाटील

**(b) Father's Name (वडील चे नाव) :** बळवंत पाटील

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1955 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वारणानगर,पन्हाळा,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वारणानगर,पन्हाळा,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8999580964

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | चंद्रकांत श्रीपती भोसले | | वडील का नाम : श्रीपती भोसले | 1. प्लॉट 30,गगनगिरी हौसिंग सोसायटी, भोसलेवाडी,कोल्हापूर,शाहुपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,000/ रूपये | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 5,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक-11/02/2021मी पंडीतराव बळवंत पाटील, वय 66, व्यवसाय - वकील, रा. वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर मो.नं. 8999580964, 7588064002 आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील गावचा रहिवाषी असुन गावी मी माझे कुटूंबीयांसह एकत्रीत राहणेस आहे. मी व्यवसायाने वकील आहे.वडगांव पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 34/2021 भा.दं.वि.सं. कलम 306, 498(अ), 504, 506, 34 प्रमाणे दाखल गुन्हयातील आरोपी नं. 1) दिपक पांडूरंग कापरे, 2)पांडूरंग गुंडा कापरे, दोघे रा. कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर हे आरोपी असून ते माझे मित्र व पक्षकार आहेत. त्यांचा सदर गुन्हयाचे वकीलपत्रमी वडगांव व कोल्हापूर कोर्टात दाखल केलेआहे. मी वरील आरोपी यांचा वकील व मित्र असल्यामुळे सदर गुन्हयाच्या कामातील पांडूरंग कापरे यांचे अटकपूर्व जामिनाची पूर्तता करणेसाठी दि.08/02/2021 रोजी वडगांव पोलीस ठाणेत जावून सदर गुन्हयाचा तपास करणारे पीएसआय भोसले यांना भेटलो असता पीएसआय भोसले यांनी सदर गुन्हयाच्या तपासामध्ये आरोपीना मदत करणेसाठी माझेकडे रक्कम 5000/-रूपये ची मागणी केली. पीएसआय भोसले हे माझेकडे मागत असलेले 5000/-रूपये हे लाच म्हणूनच मागत असलेची माझी खात्री झाली. परंतू त्यांना लाच देणेची माझी इच्छा नसलेने मी दि. 08/02/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे जावुन पोलीस उपअधीक्षक श्री बुधवंत साहेबांची भेट घेवुन माझी वरीलप्रमाणे थोडक्यात तक्रार सांगितली आणि मी वडगांव पोलीस ठाणेमधील पीएसआय भोसले यांना दि.11/02/2021 रोजी वडगांव पोलीस ठाणे येथे जावून भेटनार असल्याचे बुधवंत साहेबांना सांगितले. आणि मी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून निघून आलो. त्यानंतर मी दि. 10/02/2021 रोजी बुधवंत साहेबांना फोन केला असता त्यांनी पोलीस निरीक्षक सरनोबत साहेब हे दि.11/02/2021 रोजी आपणास भेटतील त्यांना आपली तक्रार सविस्तर सांगा ते आपल्या तक्रारीवर कारवाई करतील असे सांगितले. मीदि.11/02/2021 रोजी साधारण सकाळी 09.30 वा.चे सुमारास अँन्टी करप्शन ब्युरोकडील पोलीस निरीक्षक श्री सरनोबत साहेबांनीमला फोन केला असता मी त्यांना वाठार भादोले रोडवर थांबत असल्याचे सांगितले. त्यानंतर मी 10.15 वा.चे सुमारासवाठार भादोले रोडवर गेलो असता तेथे खाजगी इनोव्हामध्ये त्यांचेकडील स्टाफसहयेवुन थांबलेले पोलीस निरीक्षक श्री.युवराज सरनोबत यांची भेट घेतली. त्यावेळी मीवडगाव पोलीस ठाणेमधील पीएसआय भोसलेयांचे लाच मागणीचे अनुषंगाने त्यांचेविरुध्द कारवाई होणेकरीता तक्रारी अर्ज पोलीस निरीक्षक श्री.युवराज सरनोबत यांना दिला त्यांनीमाझी तक्रार पंचांना सांगणेची सुचना दिली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचांना सांगितली. त्यानंतर श्री. सरनोबत साहेबांनी माझी लेखी तक्रार पंचांना वाचण्यास दिली. मी सांगितलेली तोंडी तक्रार व लेखी तक्रार एकच असलेची पंचांची खात्री झाली. त्यानंतर श्री.सरनोबत साहेबांचे सुचनेनुसार दोन्ही पंचांनी माझे लेखी तक्रारीखाली सह्या केल्या. तसेच सरनोबत साहेबांनी देखील तक्रारीखाली सही केली. तक्रारी अर्जासोबत मी वकीलपत्र

व समंतीपत्र सादर केले.श्री.सरनोबत साहेबांनी मला व दोन्ही पंचांना वडगांव पोलीस ठाणे येथील पीएसआय भोसलेहे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. तसेच पडताळणीकरीता मी पीएसआय भोसले यांना भेटणेस जाताना माझेसोबत पंच श्री.भालाधरे यांना पाठवणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी मला व पंच श्री.भालाधरे यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतरसरनोबत साहेबांनीइनोव्हा गाडीमध्ये त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये मेमरी कार्ड घालून रेकॉर्डर 11.00वा.चालू करुन तो माझे गळयात अंगावरील शर्टचे आतील बाजुस अडकवून दिला व मला आणि पंच श्री.भालाधरे यांना माझेकडील मोटरसायकलनंबर-डभ्.09ध्।भ्.5249यावरुन वडगांव पोलीस ठाणेमध्ये पीएसआय भोसलेयांची भेट घेणेकरीता पाठविले.तेथे जावुन मी पीएसआय भोसलेयांची भेट घेतली, तेव्हा पीएसआय भोसले यांनी वरील नमूद गुन्हयातील आरोपी यांना गुन्हयाच्या तपासात मदत करण्यासाठीरूपये 5000/- लाचेची मागणी केली. माझेत व पीएसआय भोसले यांचेत चर्चा झालेवर मी व पंच भालाधरे असे माझे मोटरसायकल वरूनपुन्हा वाठार भादोले रोडवरश्री.सरनोबत साहेब व त्यांचा स्टाफ थांबलेल्या ठिकाणी परत आलो.त्यावेळीश्री.सरनोबत सो यांनी माझेकडील डिजीटल व्हईस रेकर्डर 11.37 वा. बंद करुन ताब्यात घेतला.त्यानंतर श्री.सरनोबतसाहेबांनी मला गाडीतुन बाहेर थांबणेस सांगुन पहिल्यांदा पंच भालाधरे यांचेशी चर्चा केली. त्यानंतर मला परत गाडीमध्ये बोलवुन त्यांनी माझेकडे घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना वरीलप्रमाणेगुन्हयातील आरोपी माझे मित्र व पक्षकार यांना गुन्हयाच्या तपासात मदत करण्यासाठी पीएसआय भोसले यांनी माझेकडे रूपये 5000/-लाचेची मागणी केली असता मी त्यांना तासाभरात पैसे घेवुन येत असलेचे सांगितले असल्याचे सांगितले. त्यानंतर श्री.सरनोबतसाहेबांनी डिजिटल रेकर्डरमधील माझे आणि पीएसआय भोसले यांचेतील लाच मागणी संदर्भातील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. सदर ऐकले संभाशणावरुन व पंच श्री.भालाधरे आणि माझे सांगणेवरुन पीएसआय भोसले यांनी गुन्हयातील आरोपी माझे मित्र व पक्षकार यांना गुन्हयाच्या तपासात मदत करण्यासाठी 5000/-रू. लाच रक्कमेची मागणी केलेचे निश्पन्न झाले.श्री.सरनोबतसाहेबांनी मला व पंचांना सापळा पुर्व पंचनामा सुरु करीत असलेचे सांगुन मला लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्या प्रमाणे मी 5000/रूपये लाच म्हणून देणेसाठी हजर केले. लाच रक्कमेतील नोटांचे नंबर्स एका कागदावर लिहून तो कागद पंच नंबर 2 चव्हाण यांना देणेत आला. त्यानंतर सरनोबत साहेबांनी मला आणि पंचांना अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे महत्व सांगितले. मी हजर केलेल्या नोटांना इनोव्हा गाडीचे मधील सिटवर पांढरा कागद अंथरुन त्यावर लाच रक्कमेतील नोटा ठेवून पोनाघोसाळकरयांनी अँन्थ्रसिन पावडर लावून घेतली व गाडीमध्ये काळे कापडाचे साहायाने अंधार करुन नोटांची अल्ट्राव्हायोलेट बटरीचे सहायाने मला व पंचांना तपासणी करुन दाखविली. त्यानंतर घोसाळकर यांनी ती लाच रक्कम 5000/-माझे शर्टचे डाव्या बाजुचे खिषात घडी करून ठेवली. त्यानंतर सरनोबत साहेबांनीडिजीटल व्हाईस रेकर्डर मधील वापरले मेमरी कार्ड काढुन सुरक्षित आपले जवळ ठेवले व रेकर्डरमध्ये नवीन सनडिस्क कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडी कार्ड घालून त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाशण ध्वनिमुद्रीत नसल्याची खात्री करून देवुनमला, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचा-यांना सापळ्याचे अनुषंगानेयोग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर सरनोबत साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर 12.13 वा.चालु करुन तो माझे गळयात षर्टचे मागील बाजूस अडकविला. तेथून मला व पंच भालाधरेयांना माझेकडील मोटरसायकल वरून वडगांव पोलीस ठाणेमधील पीएसआय भोसले यांची भेट घेण्यासाठी वडगांव पोलीस ठाणे येथे पाठविले व सरनोबत साहेब व त्यांचा स्टाफ आणि पंच नं. 2 श्री.चव्हाण असे त्यांचेकडील खाजगी इनोव्हा वाहनाने आमचे पाठोपाठ आले. वडगांव पोलीस ठाणेचेआवारात मी मोटरसायकल लावून वडगाव पोलीस ठाणेमध्ये जावुन पीएसआय भोसले यांची भेट घेतली असता, त्यांनी पोलीस ठाणे इमारतीच्या बाहेर थांबण्यास सांगितलेने मी पंच नं.1 भालाधरे यांचेसह बाहेर येवून थांबलो.थोडयावेळाने पीएसआय भोसले हे पोलीस ठाणेमधून बाहेर आले आणि मला होमगार्ड पथकाचे खोलीच्या भिंतीचे आडोषास घेवून गेले त्या ठिकाणी पीएसआय भोसले यांनी उजवे हाताचे बोटाचे इषा-याने माझेकडे लाच रक्कमेची मागणी केलेने मी माझे शर्टचे खिषातील लाच रक्कम 5000/- रूपयेपीएसआय भोसले यांना दिली असता त्यांनी लाच रक्कम स्विकारुन त्यांचे पंटचे उजवे खिषात ठेवली. आमचे थोडीषी चर्चा झालेवर पीएसआय भोसले पोलीस ठाणेच्या इमारतीमध्ये गेले.त्यानंतर मी तेथून बाजूला येवूनपीएसआय भोसलेयांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत मी माझे तोंडावर मास्क चढवूनसापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी सरनोबत साहेबांनी माझेकडील डिजीटल व्हईस रेकर्डर 12.37 वा. बंद करुन ताब्यात घेतला आणि सरनोबत साहेबव त्यांचे सोबतचा स्टाफ यांनी वडगांव पोलीस ठाणेमध्ये जावून पीएसआय भोसलेयांना पकडले.त्यांचेकडून पंच साक्षीदार यांचेसमक्ष सरनोबतसाहेब यांनी लाच रक्कम 5000/-रूपये जप्त केली आहे. वडगांव पोलीस ठाणेमधील पीएसआय भोसलेयांनी दिपक कापरे वगैरे यांचे विरुध्द वडगांव पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयाच्या तपासात मदत करणेसाठी माझेकडे 5000/- रूपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडले आहे. म्हणून चंद्रकांत श्रीपती भोसले, वय 55 पोलीस उपनिरीक्षक, वडगांव पोलीस ठाणे,जि.कोल्हापूर यांचेविरुध्द माझी फिर्याद आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): PRADEEP SHIVAJI KALE(I (Inspector)) / PBMH75621 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): PRADEEP SHIVAJI KALE

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PBMH75621